**"विशेष कार्यकारी अधिकारी तथा राज्य संपर्क अधिकारी (राष्ट्रीय सेवा योजना) यांच्या निर्लेखित करण्यात आलेल्या वाहनाच्या बदल्यात नवीन वाहन खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत"**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२५/प्र.क. ३६ /नों.शा.**
४ था मजला, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २४ ऑगस्ट, २०२६

**संदर्भ:**

१) विभागाचा शासन निर्णय क्र. इएसटी-४४१५/(प्र.क्र. ५८/२०१५)/आस्था-१, दिनांक १६ जुलै, २०१५

२) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क.८२/भाग-III/ उद्योग-४, दि.०१.१२.२०१६

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.२१५/उद्योग-४, दिनांक २४.०८.२०१७

४) विभागाचे ज्ञापन क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.०२/नों. शा., दिनांक ०५.०३.२०२०

५) शासन निर्णय, वित्त विभाग क्र वाहन-२०२५/प्र.क्र-१९/विनियम दिनांक १७.०९.२०२५

६) शासन निर्णय वित्त विभाग क्र.: विअप्र-२०२६/प्र.क. २२/विनियम,दिनांक ११.०८.२०२६

**प्रस्तावना:**

राज्यस्तरीय वाहन आढावा समितीने दिलेल्या मान्यतेनुसार संदर्भ क्र. १ अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभाग (खुद्द) चा वाहन आढावा मंजूर करण्यात आला आहे. सदर वाहन आढाव्यानुसार विशेष कार्यकारी अधिकारी तथा राज्य संपर्क अधिकारी (राष्ट्रीय सेवा योजना) यांना जीप प्रकारातील वाहन अनुज्ञेय करण्यात आले आहे. तद्नंतर, शासकीय परिवहन सेवा यांच्या अहवालानुसार विशेष कार्यकारी अधिकारी तथा राज्य संपर्क अधिकारी (राष्ट्रीय सेवा योजना) यांचे वापरातील शासकीय वाहन क्र. MH-०१ S-५२०१ हे संदर्भ क्र. ४ येथील ज्ञापनान्वये निर्लेखित करण्यात आले आहे.

तसेच, संदर्भ क्र. ५ येथील शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ५ अन्वये वाहन आढाव्याअंती मंजूर झालेल्या वाहनांपैकी, सर्व विहित अटींची पूर्तता करुन निर्लेखित झालेल्या वाहनाच्या बदल्यात नवीन वाहन खरेदीचे प्रस्ताव, राज्यस्तरीय वाहन आढावा समितीसमोर सादर न करता यथास्थिती मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या बाबतीत संबधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या प्रमुखांच्या स्तरावर मान्य करण्यात येतील, अशी तरतूद करण्यात आली आहे.

त्यानुसार, अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांनी विशेष कार्यकारी अधिकारी तथा राज्य संपर्क अधिकारी (राष्ट्रीय सेवा योजना) यांना अनुज्ञेय करण्यात आलेल्या व संदर्भ क्र. ४ येथील ज्ञापनान्वये निर्लेखित करण्यात आलेल्या वाहनाच्या बदल्यात नवीन वाहन खरेदी करण्यास मान्यता दिली आहे. सबब, विशेष कार्यकारी अधिकारी तथा राज्य संपर्क अधिकारी (राष्ट्रीय सेवा योजना) यांच्या कार्यालयीन वापराकरिता नवीन शासकीय वाहन खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय:</u>**

संदर्भ क्र. ५ येथील शासन निर्णयान्वये शासकीय वाहनांचे किंमत मर्यादा धोरण निश्चित करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद-१, “अ.क्र. ७- राज्य स्तरीय वाहन आढावा समितीने वाहन अनुज्ञेय केलेले इतर अधिकारी” यांना रू. १२ लक्ष इतक्या किंमत मर्यादेत वाहन अनुज्ञेय करण्यात आले आहे. त्यानुसार, विशेष कार्यकारी अधिकारी तथा राज्य संपर्क अधिकारी (राष्ट्रीय सेवा योजना) यांना रू. १२ लक्ष इतक्या किंमत मर्यादेत वाहन खरेदी करणे अनुज्ञेय आहे.

२. संदर्भ क्र. ५ अन्वये विशेष कार्यकारी अधिकारी तथा राज्य संपर्क अधिकारी (राष्ट्रीय सेवा योजना) यांना अनुज्ञेय करण्यात आलेल्या व शासकीय परिवहन सेवा यांच्या अहवालानुसार संदर्भ क्र. ४ अन्वये निर्लेखित करण्यात आलेल्या वाहनाच्या बदली नवीन शासकीय वाहन खरेदी करण्यास तसेच, सदर खरेदीस येणाऱ्या अंदाजित रू. १२ लक्ष (रूपये बारा लक्ष फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३. संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयानुसार विशेष कार्यकारी अधिकारी तथा राज्य संपर्क अधिकारी( राष्ट्रीय सेवा योजना) यांचे वापराकरिता Mahindra & Mahindra Passenger Car SUV (Sports Utility Vehicle) Diesel (Mahindra Bolero Neo+ P10 BSVI (9 SEATER)) या वाहन खरेदीची प्रक्रिया Government e-Marketplace (GeM) पोर्टलद्वारे करण्यात यावी.

४. वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ११ ऑगस्ट, २०२६ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८ मधील उपविभाग-२, अ.क्र.२७, नियम क्र. ६९ नुसार निर्लेखित करण्यात आलेल्या वाहनाच्या बदल्यात नवीन वाहन खरेदी करणे अनुज्ञेय आहे. प्रस्तुत प्रकरणी मंत्रालयीन प्रशासकीय विभागप्रमुखांना मान्यता देण्याबाबत पूर्ण अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

५. सदर वाहन खरेदीस येणारा खर्च “मागणी क्र.डब्ल्यू-०६, २२५१-सेक्रेटरीएट-सामाजिक सेवा, ९०-सेक्रेटरीएट-उच्च व तंत्र शिक्षण, (०२) राष्ट्रीय सेवा योजना, (०२)(०१) राष्ट्रीय सेवा योजना, ५०-इतर खर्च (२२५१०३३८)” या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८२४१५२९२३५१०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PAGARE SHRIKRISHNA KASHINATH

Digitally signed by PAGARE SHRIKRISHNA KASHINATH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=cc78d6dbb4fe0c3d5473ed374dc1007ae7db08a8a6ca9468ce2a8aae16c0cb06, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4E8BC157609C105D396B04018FA47F8909333AFC18DDC3893CC043F18F759C0B, cn=PAGARE SHRIKRISHNA KASHINATH
Date: 2026.08.24 16:41:18 +05'30'

**(श्रीकृष्ण पगारे)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति:**

१) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव

२) मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव

३) अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

४) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता-१/२, मुंबई/नागपूर

५) महालेखापाल, लेखापरिक्षा-१/२, मुंबई/नागपूर

६) विशेष कार्यकारी अधिकारी तथा राज्य संपर्क अधिकारी (राष्ट्रीय सेवा योजना), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

८) निवडनस्ती (नोंदणी शाखा)